CNR-MHYA110001682026

**दि.कि.अर्ज क्र. १३/२०२६**

**कमल हाके +३वि. कोणीही नाही**

**निशाणी क्र.०१ वरील आदेश**

(पारीत दिनांक ०२ एप्रिल, २०२६)

**०१**. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस दाखला मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**अर्जाची थोडक्यात हकीगत की,**

**०२.** मयत वच्छलाबाई तुकाराम हराळ हे मौज अमडापुर, ता. उमरखेड, जि. यवतमाळ येथील कायम रहीवासी होते, त्यांचा मृत्यू दिनांक ०४.०९.२०२५ रोजी मौजे अमडापुर ता. उमरखेड जि. यवतमाळ येथे झाला त्यांचा अंत्यविधी मौजे उमरखेड येथे पार पडलेत. तसेच तिचा पती तुकाराम मोहनाजी हराळ यांचा मृत्यू कुपटी झाला. अर्जदार क्र. १ व २ ह्या मुली आणि अर्जदार क्र. ३ व ४ हे मुले आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयताचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे मयतास अर्जदार यांच्याशिवाय दुसरे कुणीही वारस नाहीत. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरिता मयत वच्छलाबाई तुकाराम हराळ यांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची नितांत आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकामी न्यायालयात प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** अर्जदार यांनी अर्ज दाखल केल्यानंतर वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती ते **नि.क्र. १०** वर दाखल केले आहे. तसेच, जाहीर **नोटीस नि.क्र. ०७** प्रसिध्द करण्यात आली परंतु, अद्यापपावेतो कोणाकडूनही हरकत नोंदविण्यात आली नाही. तसेच, प्रसिध्द केलेल्या जाहीर नोटीसवरुन देखील हरकत नोंदविण्यात आली नाही.

**०४.** अर्जदारांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. अभिलेखावरील अर्जातील कथनांचे व विनंतीचे अवलोकन केले असता, खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाल्यावरुन मी खालीलप्रमाणे विवेचनासह निष्कर्ष नोंदविलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत का? | ... होकारार्थी. |
| ०२. | काय आदेश? | ... अर्ज मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक ०१ करीता :–

**०५.** अर्जदार यांनी आपल्या अर्जाच्या पुष्टर्थ **(नि.क्र. ११)** लगत अर्जदार क्र. १ यांचे शपथपत्र दाखल केले. साक्षीदारांनी पुराव्यामध्ये मयत वच्छलाबाई तुकाराम हराळ यांचे निधन दिनांक ०४.०९.२०२५ रोजी मौजा अमडापुर ता. उमरखेड जि. यवतमाळ येथे झाल्याचे कथन करुन अर्जदार यांच्या व्यतिरिक्त इतर वारस नसल्याचे कथन केले. त्यांनी नि.क्र. ०३ वच्छलाबाई तुकाराम हराळ यांचे मृत्यूप्रमाणपत्र **(नि.क्र.१२)**, तसेच मयताचे आधारकार्डची प्रमाणित प्रत **(नि.क्र.१३),** अर्जदार यांचे प्रमाणित आधारकार्डच्या प्रती **(नि.क्र.१४ ते १७)** तसेच **(नि.क्र.१०)** लगत दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द जाहीर सायटेशन नोटीस दाखल केली आहे. अर्जदार यांनी **(नि.क्र. १८)** नुसार पुरावा बंद पुरशिस दाखल केली. सायटेशन नोटीस व जाहीर नोटीस ही प्रसिध्द करुन देखील आजतागायत कोणीही अर्जदार यांच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

**०६.** अर्जदार यांनी दाखल केलेल्या शपथपत्र **(नि.क्र. ११)**चे अवलोकन केले असता आणि **(निशाणी क्र.१२)** वरील मृत्यू प्रमाणपत्रानुसार मयत वच्छलाबाई तुकाराम हराळ हे मयत असल्याचे दिसुन येते. अर्जदार यांनी पुराव्यात कथन केल्यानुसार,

त्यांच्याशिवाय मयतास कोणीही इतर वारस नाहीत. अर्जदार हे वच्छलाबाई तुकाराम हराळ यांचे वारस असल्याच्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही.

**०७.** अर्जदार यांनी साक्षीमध्ये सांगीतलेल्या कथनास कागदपत्रे दुजोरा देतात. अर्जदार व्यतिरीक्त मयत वच्छलाबाई तुकाराम हराळ यांना कोणीही वारस नसल्याबाबत अर्जदार यांचा पुरावा विना आव्हानीत असल्यामुळे त्यास शंका घेण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. मयत वच्छलाबाई तुकाराम हराळे हे मौजे अमडापुर ता. उमरखेड,जि. यवतमाळ येथील रहीवासी असल्याचे सिध्द करण्याकरीता अर्जदाराने मयताचे मृत्यू प्रमाणपत्र **(नि.क्र.१२)** दाखल केले आहे त्यावर मयताचा पत्ता अमडापुर ता, उमरखेड, जि. यवतमाळ असा नमुद आहे, त्याचे अवलोकन केले असता मयताचा रहीवासाचा पत्ता रा.आमडापुर, ता. उमरखेड, जि. यवतमाळ असल्याचे दिुसन येते. त्यामुळे या न्यायालयास अर्ज चालविण्याचा अधिकार असल्याचे सिध्द होतो. अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असल्याचे सिद्ध होते. त्यामुळे वरील विवेचनावरुन अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे समाधान झाल्यावरुन अर्जदार हे मयताचे वारस असल्याचा दाखला मिळविण्यास पात्र असल्याच्या निष्कर्षास हे न्यायालय आले आहे यावरुन मुद्दा क्र. ०१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.०२ करीता :-</u>**

**०८.** अर्जदार यांनी अर्जामध्ये मिळकतीचे वर्णन केलेले नसल्यामुळे सदरील प्रमाणपत्र अर्जदार हे मयत वच्छलाबाई तुकाराम हराळ यांचे वारस असल्याचे घोषीत होऊन मिळण्यासाठी पात्र ठरतात. मुद्दा क्र.०१ चे उत्तर होकारार्थी नोंदविले असल्याने अर्जदार यांचे नावे वारस प्रमाणपत्र देणे न्यायोचित असल्याने मी मुद्दा क्र.०२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

| | |
|---|---|
| ०१. | अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ०२. | अर्जदार १. श्रीमती कमल दत्तराव हाके, ०२. श्रीमती छायाबाई किसन खुन्नर, ०३. दत्ता तुकाराम हराळ आणि ०४. दिगांबर तुकाराम हराळ हे **मयत वच्छलाबाई तुकाराम हराळ** यांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र योग्य ती कायदेशीर कोर्ट फी आकारुन अर्जदार यांना देण्यात यावे. |
| ०३. | सदरचे प्रमाणपत्र हे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) असून उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) नाही. |
| ०४. | सहायक अधीक्षक यांनी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली कोर्ट फी चा तपशिल द्यावा. |
| ०५. | सदर प्रमाणपत्र दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिच्छेद ३१२ मधील टिपणीस अधीन राहून देण्यात येत आहे. अर्जदार यांनी प्रमाणपत्र प्राप्तीपासून वरील टिपणीस अनुसरुन पुढील पुर्तता करावी. |

(**एस.जी. ठाणेदार**)
दिनांकः ०२.०४.२०२६ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
उमरखेड

**CERTIFICATE**

" I certify that this Order uploaded is a true and correct copy of original signed Order"

| | | |
|---|---|---|
| Order directly dictated on | : | 02.04.2026 |
| Order checked and signed on | : | 02.04.2026 |
| Uploaded by | : | B.G.Sawate, Stenographer (Gr.III) |
| Uploaded on | : | 02.04.2026 |